**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक विधानपरिषदेतही आवाजी मतदानानं मंजूर, महाविकास आघाडीचा विरोध /या विधेयकाच्या विरोधात वंचित बहुजन आघाडी न्यायालयात जाणार

- विविध सरकारी विभागांमधे नव्यानं नियुक्त झालेल्या ५१ हजार युवकांना उद्या प्रधानमंत्र्यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे नियुक्तीपत्रांचं वितरण

- छत्तीसगडमधे २२ माओवाद्यांचं पोलिसांसमोर आत्मसमर्पण

- **आणि**

- भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात इंग्लंडच्या पहिला डावात ३८७ धावा, भारताची खराब सुरुवात

**<><><><>**

महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक विधानपरिषदेनं आज विरोधकांनी सभात्याग केल्यानंतर त्यांच्या अनुपस्थितीत आवाजी मतदानानं मंजूर केलं. या विधेयकाला काल विधानसभेची मंजुरी मिळाली होती. आज गृहराज्यमंत्री योगेश नाईक यांनी हे विधेयक विधानपरिषदेत मांडलं. हा कायदा नागरिकांच्या संरक्षणासाठी आणला असल्याचं सांगून यामागची सरकारची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब यांनी या विधेयकाला विरोध केला. नक्षलवाद, दहशतवादाला डावी किंवा उजवी विचारसरणी नसते. हा कायदा उजव्या अतिरेक्यांना सोडणार का? एखाद्या संघटनेला लक्ष्य करण्याचा यामागचा उद्देश आहे का, असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले.

या विधेयकाबाबत राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार करायची गरज असल्याचं मत भाजपा आमदार प्रवीण दरेकर यांनी मांडलं. काँग्रेसचे अभिजीत वंजारी यांनी 'कडवी डावी विचारसरणी' या शब्दाला आक्षेप घेतला. या विधेयकाला काँग्रेसचा विरोध असल्याचं सांगितलं. भाजपाचे प्रसाद लाड यांनी या विधेयकाला पाठिंबा देताना शिवसेनेविषयी केलेल्या वक्तव्यावर आक्षेप घेत विरोधकांनी सभागृहात गदारोळ आणि नंतर सभात्याग

केला. त्यानंतर विधान परिषदेचं कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात आलं. कामकाजाला पुन्हा सुरुवात झाल्यानंतर विरोधकांच्या अनुपस्थितीत महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक आवाजी मतदानानं मंजूर करण्यात आलं.

**<><><>**

या विधेयकावरच्या आक्षेपांचं पत्र महाविकास आघाडीनं सभापतींना दिलं आहे. संयुक्त समितीच्या शिफारशींनंतर काही प्रक्रियात्मक बदल केले असले तरी, विधेयकाची मूळ रचना दडपशाहीची, संदिग्ध आणि दुरुपयोगाला पात्र असल्याचं या पत्रात नमूद केलं आहे. या विधेयकाला मंजुरी देऊ नका अशी विनंती राज्यपालांना करणार असल्याचं विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी वार्ताहरांना सांगितलं.

पूर्वी मिसा, टाडा कायदा होता त्याप्रमाणे हा कायदा असल्याची टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. या विधेयकाच्या मसुद्यात नक्षलवाद, दहशतवाद असा कुठेही उल्लेख नाही, असं ते म्हणाले.

- **- होल्ड उद्धव ठाकरे बाइट - -**

- **<><><>**

महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेवर हल्ला करणारे आहे. त्यामुळं या विरोधात न्यायालयात लढा देणार असल्याची घोषणा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

**<><><>**

महाराष्ट्रात एकंदर ३ हजार ३६७ धार्मिक स्थळांवरचे भोंगे आत्तापर्यंत हटवण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिली. हटवलेले भोंगे पुन्हा लावले तर तिथल्या पोलीस ठाण्यातल्या प्रभारी अधिकाऱ्याला जबाबदार धरलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

राज्यातल्या सरकारी जमिनींवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम करण्यासाठी जबाबदार असणाऱ्या महसूल विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी विचार सुरू आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या दूरदृश्यप्रणाली द्वारे विविध सरकारी विभागांतल्या नव्यानं नियुक्त झालेल्या युवकांना ५१ हजारांहून अधिक नियुक्ती पत्रांचं वितरण करणार आहेत. हा १६वां रोजगार मेळा देशभरात ४७ ठिकाणी आयोजित केला जाणार असून प्रधानमंत्री यात संबोधन करणार आहेत. नवीन भरती केलेले युवक रेल्वे मंत्रालय, गृह मंत्रालय, आरोग्य-कुटुंब कल्याण, कामगार-रोजगार, पोस्ट यासह अन्य विभागांमध्ये सामील होतील. देशभरात रोजगार मेळ्यांद्वारे आजवर १० लाखांहून अधिक नियुक्ती पत्रं जारी करण्यात आली आहेत.

**<><><><>**

छत्तीसगडमधल्या नारायणपूर जिल्ह्यात आज २२ माओवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. या सर्वांवर मिळून सुमारे साडे सदतीस लाखाचं बक्षीस ठेवण्यात आलं होतं, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक रॉबिन्सन गुरिया यांनी दिली. आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये मदतीच्या रूपात देण्यात आले. याशिवाय त्यांच्या पुनर्वसनासाठी इतर सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**<><><><>**

कॅन्टीन कर्मचाऱ्याच्या मारहाण प्रकरणी शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्या विरोधात मुंबईतल्या मरीन ड्राइव्ह पोलिसांनी तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणाची पोलिस योग्य चौकशी करतील, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं.

- **- होल्ड मुख्यमंत्री बाइट - -**

- **<><><><>**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं टोलवसुली सुरळीत करण्यासाठी फास्टॅग्जविषयीच्या तक्रारी नोंदवण्याचे निर्देश टोल वसुली करणाऱ्या संस्थांना दिले आहेत. गाडीच्या दर्शनी भागात फास्टॅग लावणं गरजेचं असताना काही जण हातातून तो दाखवत असल्याचं निदर्शनाला आलं आहे. त्यामुळे टोलवसुलीसाठी वेळ लागतो. या प्रकाराला आळा घालण्यासाठी प्राधिकरणानं तक्रार दाखल करण्याचे निर्देश दिले असून त्यासाठी वेगळा ईमेल आयडीही दिला आहे. या तक्रारीत नमूद असलेल्या फास्टॅग धारकांना काळ्या यादीत टाकलं जाईल, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><>**

एक राष्ट्र एक निवडणूक या संदर्भातल्या संयुक्त संसदीय समितीची आज संसद भवनात बैठक झाली. संविधान सुधारणा विधेयक, २०२४ आणि केंद्रशासित प्रदेश कायदे सुधारणा विधेयक २०२४ चे परीक्षण करण्याच्या व्यापक सरावाचा एक भाग म्हणून ही बैठक झाली. देशात लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेणं शक्य करणं, हा या सुधारणांचा उद्देश आहे. बैठकीत माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती जगदीश सिंह खेहर आणि न्यायमूर्ती डी वाय चंद्रचूड यांनी देशात एकाच वेळी निवडणुकांच्या मुद्द्यावर सादरीकरण केलं.

**<><><><>**

अवजड उद्योग मंत्री एच.डी. कुमारस्वामी यांनी आज पीएम ई-ड्राईव योजनेअंतर्गत इलेक्ट्रिक ट्रक- स्वच्छ आणि शाश्वत इंधन प्रोत्साहन योजना सुरू केली. या योजनेचा उद्देश सुमारे ५ हजार सहाशे ई-ट्रक तैनात करणं, स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन देणं, लॉजिस्टिक्सचा खर्च आणि कार्बन उत्सर्जन कमी करणं हा आहे. यात बॅटरीसाठी ५ वर्षे किंवा ५ लाख किलोमीटरची वॉरंटी समाविष्ट असेल. दिल्लीत नोंदणीकृत सुमारे अकराशे ई-ट्रकांसाठी एक हजार कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे.

**<><><><>**

कापूस लागवडीतील समस्या, रोपांना होणारे रोग, विणकर आणि कृषी उद्योगाशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी सरकार उपाययोजना करणार आहे, असं केंद्रीय कृषी आणि शेतकरी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. कोइम्बतूर येथील आयसीएआर संशोधन केंद्राला भेट दिल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><>**

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात आज दुसऱ्या दिवशी इंग्लंडचा पहिला डाव ३८७ धावांवर संपला. ज्यो रुटनं सर्वाधिक १०४ धावा केल्या. भारतातर्फे जसप्रित बुमराहनं ५, नितीश कुमार रेड्डी आणि महंमद सिराज यांनी प्रत्येकी २, तर रविंद्र जडेजानं एक गडी बाद केला.

भारताची सुरुवात खराब झाली. डावातल्या दुसऱ्या षटकातच यशस्वी जैस्वाल १३ धावांवर बाद झाला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १ बाद ४४ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

नांदेड जिल्ह्यात मुदखेड इथं केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या १४८ जवानांचा दीक्षांत समारंभ आज झाला. यावेळी उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या जवानांना विशेष पारीतोषिक देऊन गौरवण्यात आलं. तसंच केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांनी चित्तथरारक प्रात्यक्षिक सादर केली. अनेक मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते.

**//<><><><>//**